

## ।। इवलेसे रोप लावियेले द्वारी।
## त्याचा वेलू गेला गगनावरी।।

**आपला महाराष्ट्र म्हणजे, महान राष्ट्र !**

महान लोकांचे राष्ट्र। ऋषी, महर्षी, राजर्षी, शूरविर, विरांगना, आचार्य. सांधू संतत, महंन, क्रांती कारक आणि सहकार महर्षिच राष्ट्र। सह्याद्री-सातपुडा यांनी कणखर बनलेला देश ज्ञानोबा-तुकोबांच्या अमृतवाणीने कृतार्थ झालेला देश, सहकार चळवळीची साखर पेरणी करुम सुजलम-सुफलम झालेला देश म्हणजे आपला महाराष्ट्र देश! म्हणून आम्ही अभिमान गुणगुणत असतो, 'बहु असोन 'सुंदर संपन्न की महा प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा।

अशा या महाराष्ट्रातील जिल्हा पुणे, तालुका जुन्नर मधील एक आदर्श गाव म्हणजे शिरोली बुद्रूक गाव अष्टविनायक गणपतीचे अवतार कार्य ओझरचा विघ्नहर लेण्याद्रीचा गिरीजात्मक यांचा वरदहस्त लाभलेला धार्मिक, परंपरा वारकरी सांप्रदयाचा वसा जोपसणाचे एक थोर गाव म्हणजे शिरोलीगाव । ज्या जुन्नर तालुक्यातील पुण्यभूमीत छत्रपती शिवाजी महाराज जन्माला आले... धर्मासाठी व स्वराज्यासाठी लढले मारायला आणि वेळ प्रसंगी मरायलाही तयार असणारे शूर मावळ-मराठे सोबतीला घेऊन त्यांनी महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याची उभारणी केली. त्या शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेला एक गाव म्हणजे शिरोली गाव। पंढरपूरच्या चंद्रभागा प्रमाणे कुकडीमातेने चंद्रकोर वळसा घालून सुजलम-सुफलम बनविलेला एक गाव म्हणजे शिरोली गाव। जुन्नर तालुक्याचे भाग्य विधाते, सहकार महर्षि, विघ्नहर साखर कारखान्याचे संस्थांपक चेअरमन देव माणूस स्व. निवृत्तीशेठ शेरकर यांची जन्मभूमी म्हणजे शिरोली गाव।

आशा शिरोली गावच्या नावाला देखील ऐतिंहासीक पार्श्वभूमी आहे. ज्यावेळी मोगल फौजांनी मराठी मुलखान थैमान घातले होते. त्यावेळी शिवरायांच्या मावळ्यांनी मोठ्या प्रमाणात शह दिली कुकडी नदीच्या तिरावर दोन्ही सैन्यांत तुंबळ युध्द होऊन मराठ्यांचा विजय झाला होता. या युध्दामध्ये कुकडीनदीच्या दोन्ही तिरांवर दोन्ही सैन्यांच्या धडा वेगवेगळ्यशिरांचा खच पडला होता जणू काही या शिरांची माळच ओवली म्हणून तेव्हांपासून नदीच्या दोन्ही तिरावरील गावांना शिर-ओवली पुढे अपब्रहंश होऊन शिरोली असे नाव रूढ झाले असावे अशी आरव्यायिका आहे.

शिरोली बुद्रुक सुरुवातीपासून शेतीप्रधान गाव आहे. सुमारे ६० ते ७० वर्षापूर्वीचा काळ-गावामध्ये ठराविक विहीरी व मोजकीय बागायती शेती होती.जिरायती शेतीकमल पावसाचे वर अवलंबून. त्यामुळे जिरायती शेतीवर विसंबून स्वतःचा व कुटुंबाचा विकास होणार नाही म्हणून गावातील काही धुरंदर व्यक्तींनी मुंबईचा मार्ग धरला. स्वकर्तुत्वावर व्यापार धंदा कॉफर्ड मार्केट, भुलेश्वर भायखळा, दादर व वाशी मार्केट मध्ये प्रतिष्ठित व्यापारी म्हणून ओळखले जाणारे स्व. दत्तूशेठ सावळाराम शेरकर, सिताराम भाऊ थोरवे, राजनशेठ रामभाऊ थोरवे, काराभारीशेठ नामदेव राऊत, बन्सीशेठ ठकूजी रोकडे, मारुती शंकर थोरवे, विलासशेठ दत्तात्रय शेरकर, सहादू भिकाजी शेरकर, शंकर बबन भुजबळ, परमानंद खंडू राऊत, लक्ष्मण शंकर बोऱ्हाडे, विजय अनंत थोरवे, मारूती भागूजी गाडेकर, मनाजी रामभाऊ बोऱ्हाडे, भालचंद्र सावळेराम थोरवे, दिपक राजाराम थोरवे, लक्ष्मण विष्णू शेरकर, शांताराम गेणूजी ढगे, स्व. धर्माजीबुवा दगडू जगताप, नारायण भोर, पांडुरंग विश्वास थोरवे, श्री. करीमभाई इनामदार, राजाराम शंकर शेरकर, सिताराम चिमाजी थोरवे, स्व. गणपत उर्किडे गुरुजी, मनाजी मारूती थोरवे, विश्वास शंकर शेरकर, राजाराम बबन थोरवे, रामचंद्र महादेव ताजणे, वसंत विष्णू राऊत, बाजीराव शंकर थोरवे, हरिश्चंद्र गोपाळ जगताप, शिवाजी भिकाजी थोरवे, गोविंद संभाजी देवणे, जयराम मारूती थोरवे, जयराम चिमाजी थोरवे, रामदास दगडू हांडे, वसंत पांडूरंग शेरकर, दगडू नामदेव थोरवे, निवृत्ती शंकर शेरकर, विश्वास महादेव थोरवे, काशीनाथ जयराम थोरवे, रभाजी कृष्णाजी थोरवे, बन्सी कृष्णाजी थोरवे, वसंत दत्तात्रय बोचरे, बबन रामचंद्र थोरवे, सुरेश बाबुराव थोरवे, जनार्धन काशीनाथ शेरकर, मल्हारी गेणूजी थोरवे, गंगाराम कोंडाजी जगताप, सोपान आत्माराम ढगे, सुरेश शांताराम ढगे, एकनाथ तुळशिराम विधाटे, प्रभाकर दत्तात्रय बोऱ्हाडे, तान्हाजी नामदेव बोऱ्हाडे, गणेश सहादू शेरकर इत्यादी मान्यवरांनी व्यापार-नोकरी-धंद्यामध्ये आपले स्थान मजबुत केले पुढे त्यांचे अनुकरण करीत गावातील घराघरातील नवजवान मंडळीला व्यवसाय-नोकरी निमित्त मुंबई शहराकडे ओढा आज मिती पर्यंत चालू राहिला.

घार फिरे आकाशी चित्र तोचि पिल्लापाशी, या उक्तीप्रमाणे भारताची आर्थिक राजधानी व महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहरात आपला स्वतःचा सर्वांगिन उत्कर्ष करत असतानाच कर्मभूमी बरोबर जन्मभूमीचा विसर या भूमीपुत्रांना पडला नाही. आपल्या जन्म गावासाठी काही तरी करावे अशी तळमळ बहुतेक मुंबईकरांना नेहमी वाटत होती म्हणून शिरोली बुद्रुक गावच्या मुंबईकर मंडळींनी एकत्र येऊन स्वतःच्या कुटुंबाबरोबर गावच्या विकासात खारीचा वाटा घेण्याचे ध्येय मनाशी बाळगून सुमारे सन १९६० साली **'नव जवान सेवासंघ मुंबई-शिरोली बुद्रुक'** या नावाने संघाची स्थापना करण्यांत आली दर महिन्याच्या १२ तारखेला राणीचा बाग, दगडी हत्ती भायखळा येथे (पुढे भुलेश्वर,भायखळा) मुंबईकर मंडळींच्या मिटींगी होऊ लागल्या गावाच्या घडामोडींची माहिती व विकाससंबाधी चर्चा होऊ लागल्या.

नवजवान सेवा संघाच्या माध्यमातून श्री भैरवनाथ नाट्य निकेतन, श्री भैरवनाथ प्रासादिक भजन मंडळ, उपक्रमात विजयानंद फंड श्री. दावल मालिक इत्यादी बाबत मंडळांची निर्मिती करण्यांत आली गावच्या विविध कार्यक्रमात सार्वजनिक उत्सवात संघाच्यावतीने सहभाग सातत्याने घेण्यात येत आहे. शिरोली गावचे ग्राम दैवत श्री भैरवनाथ महाराष्ट्रांची यात्रा गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर दरवर्षी मोठ्या प्रमाणात भरत असते. शिरोली बुद्रुक गावच्या नोकरी, धंदा, व्यवसानिमित्त गावाबाहेर गेलेला ग्रामस्थ यात्रे करिता कोणत्याही परीस्थित हजर राहून यात्रेची शोभा वाढवित श्री भैरवनाथ चरणी नतमस्तक होत असतो.

नवजवान सेवा संघाच्या वतीने दरवर्षी स्थापनेपासून म्हणने सुमारे ५५ वर्षापासून यात्रेनिमित्त भैरवनाथ नाट्य निकेतनच्या माध्यमातून दर्जेदार नाटकांचे सादरीकरण करुण मनोरंजना बरोबर समाज प्रबोधनाचे कार्य मुंबईकर करत आलेली आहेत. याचे निमित्त दरवर्षीसाठी आडी कारखाना, मराठी शाळा व न्यू इंग्लिश स्कूल मधील प्रथम तीन क्रमांकाने उर्त्तीण विद्यार्थ्यांना विद्यार्थी पालक, शिक्षक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे देऊन गौरव करण्यात येतो. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा वाढण्यासाठी निश्चितच फायदा झालेला आहे. संघाच्यावतीने गावावरून नोकरी धंद्या निमित्त येणाऱ्या नवजवानांना मार्गदर्शन करणे त्यांच्या अडीअडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला. मुंबई सारख्या प्रगतशिल व गतिमान शहरात स्वतःच्या आर्थिक गरजा काही प्रमाणात सोडविणे सोपे व्हावे म्हणून विजयानंद फंड ने नवजवान सेवा संघ फंडाची निर्मिती केली फंडाच्या माध्यमातून सभासदांच्या आर्थिक गरजा भागविण्याचा यशाशक्ती प्रयत्न करीत आहोत. पूर्वी बँकांचे कर्ज मिळविणे म्हणजे तारेवरची कसरत होती त्यामुळे सहजासहजी कर्ज मिळण्याचे साधन फंड होते. कर्जाबरोबर सभासदांना बचतीची सुध्दा आवड निर्माण होत होती. परंतु फंडाचा निधी मर्यादित असल्यामुळे सर्वांच्या आर्थिक अडचणी सोडविणे अशक्य होत होते.

त्याच सुमारास शिरोली बुद्रुक गावात विघ्नहर सहकारी साखर कारखाना व कृषक सहकारी संस्थांच्या माध्यमातून सहकारी चळवळ जोर धरू लागली होती. सहाकारी महर्षी आदरणीय **स्व. निवृत्तीशेठ शेरकर** यांचा आदर्श डोळ्या समोर ठेवून त्यांच्याच उपस्थितीत सन १९९० रोजी केवळ ५२५ सभासदांच्या सहभागाने **'राहूल अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.'** स्थापना करण्यांत आली. आज राहूलचा वटवृक्ष नुसताच वाढला नाहीतर २५ वर्षात चांगलाच पोचावला आहे. एका शाखेचा सात शाखां मध्ये विस्तार झाला आहे. पत्राशेडच्या भाड्याच्या जागेचे रुपांतर आज संस्थेच्या स्वमालकीच्या सात जागांमध्ये स्थावर मालमत्ता म्हणून झालेला आहे. शिरोली बुद्रुक गावचा मुंबईकर रहिवाशी म्हणून ही बाब आम्हांला अभिमानास्पंद आहे. कार्यकुशल संचालक मंडळ, जागृत सभासद आणि कर्तबगार कर्मचारी वृंद यामुळे हे सर्व घडु शकले. त्यामुळे सहज ज्ञानेश्वर माऊली आठवतात **'इवलेसे रोप लावीयले द्वारी। त्यांचा वेलू गेला गगणावरी।'**

रौप्य महोत्सव साजरा होत असताना आम्ही प्रतिज्ञा करतो की, उतणार नाही, मातणार नाही, घेतलावसा आम्ही सोडणार नाही। राहूलच्या प्रगतीचा ओळख असाच पुढे उंचावत ठेवणार।

राहूलच्या विविध उपक्रमास नवजवान सेवा संघ शिरोली बुद्रुकचे सर्व कार्यकारी मंडळ, हितचिंतक, सल्लागार व तमाम सभासदांच्यावतीने हार्दिक शुभेच्छा !

जय सहकार !

आपला सहकारी
**हरिश्चंद्र गोपाळ जगताप**
अध्यक्ष : नवजवान सेवा संघ, मुंबई शिरोली बु।।